पिंपरी चिंचवड महानगरपालिका
"ग" क्षेत्रीय कार्यालय, थेरगांव 33
क्र.गक्षेका/प्रशा/03/कावि/68/2017
दिनांक 16/10/2017

**विषय :- पी.जी.पोर्टल, आपले सरकार, मनपा वेब पोर्टल (सारथी हेल्पलाईन, ई-मेल, मा.आयुक्त शेरांकन, दै.वृत्तपत्रातील बातम्या, व्हाटस्‌ऍप मेसेज इ.) अशा प्रकारच्या तक्रारींबाबत...**

## परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ग क्षेत्रीय कार्यालय दि.09/08/2017 पासून नव्याने कार्यान्वित झाले आहे. कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.21, 23, 24 व 27 या प्रभागांचा समावेश करण्यात आलेलां आहे. क्षेत्रीय कार्यालयांतर्गत स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनि:स्सारण, अतिक्रमण व आरोग्य विभागाने कामकाजाची सुरूवात केली आहे. क्षेत्रीय कार्यालयाने त्याचे कार्यक्षेत्रातील प्रभागांमध्ये विविध नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, त्याच प्रमाण नागरीकांच्या विविध तक्रारींचे वेळचे वेळी निवारण करणे तेवढेच आवश्यक आहे. नागरीकांच्या तक्रारी पी.जी.पोर्टल, आपले सरकार, सारथी वेब पोर्टल, मा.आयुक्तांकडे/विभागाकडे केलेल्या लेखी तक्रारी, दै.वृत्तपत्रांतील तक्रार इ.नुसार कार्यालयाकडे प्राप्त होत आहे.

सबब सदरचे परिपत्रकान्वये ग क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनि:स्सारण, अतिक्रमण व आरोग्य या विभागांचे शाखा प्रमुखांना स्पष्ट कळविण्यात येते की ग क्षेत्रीय कार्यालय चालू झालेले दि.09/08/2017 पासून प्राप्त झालेले सर्व तक्रारींचे विषयानुसार रजिस्टर तयार करून त्यात नोंद घेणे आवश्यक आहे.

उदा -

| अ. क्र. | तक्रारीचे क्रमांक | तक्रारीचे दिनांक | तक्रारदारचे नांव, पत्ता व मोबाईल क्र. | तक्रारीचा तपशिल | तक्रारदारच्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा सबळ पुराव्यासह अहवाल | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

सद्य स्थितीत सर्व संबंधित कर्मचारी त्यांचे शाखा प्रमुखांचे सुचनेनुसार सदर तक्रारी निरस्त करण्यासाठी कामकाज करीत आहे. उपरोक्त प्रमाणे तक्रारी निरस्त करण्यासाठी संबंधित विभागांनी तक्रार निवारण रजिस्टर अथवा आवश्यक ते पूर्तता अहवाल तयार करणे आवश्यक आहे. प्राप्त तक्रारीचे संगणकावरून प्रिंट/झेरॉक्स काढून सदर तक्रारीची रजिस्टवर नोंद घेवून केलेल्या कार्यवाहीचा तपशिल व संबंधित तक्रारदार यांना तक्रार निवारण केले बाबत कळवून त्यानुसार नोंदी घेणेत याव्यात. योग्य ती तक्रार निवारण पध्दत अवलंबण्यात न आल्याने वेब पोर्टलवर अशा तक्रारीचे निराकरण झाले नसलेबाबतची तक्रार तक्रारदार पुनश्च करीत आहे. यामुळे नागरीक व प्रसिध्दी माध्यम थेट मनपाच्या कामकाजा विषयी शंका उपस्थित करतात. सदरची बाब ही मनपाच्या कार्यालयीन कामाकाजाच्या संदर्भात येत असल्याने या बाबत गांभीर्याने कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे क्षेत्रीय कार्यालयाशी संबंधित कोणत्याही तक्रारीचे निराकरण करताना तक्रार निवारण रजिस्टर मध्ये नोंद घेण्यात यावी. सदर रजिस्टर मध्ये शाखा प्रमुखाची स्वाक्षरी घेणेत यावी. वेब पोर्टल वरून तक्रार निरस्त केल्यानंतर ती तक्रार पुनश्च वेब पोर्टल दिसणार नाही याची खातरजमा करावी. कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता वेब पोर्टल, वृत्त पत्रांचे तक्रारीनुसार रजिस्टर व केलेल्या कारवाई चा तपशिल समक्ष तक्रारीचे ठिकाणी जाऊन तपासण्यात येईल, या मध्ये कसूर झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार कारवाई करणेत येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

क्षेत्रीय अधिकारी
"ग" क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगांव 33

प्रति :- सर्व संबंधित शाखा प्रमुख व कर्मचारी